सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**७ वा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१**

दूरध्वनी क्र. ०२२- २२०१६७३७ E-mail id- sosan.rdd-mh@nic.in

जा.क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.९३/योजना-१० दि. ३०.१०.२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय:-** राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांच्या मानधन अदायगीबाबत.

**संदर्भ :** १. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/यो-१० दि. २७.०५.२०१६.
२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१८/प्र.क्र.२४५/योजना-१० दि.२५.०९.२०१८.
३. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. बामयं/प्र. क्र.३३/वित्त-९ दि. २६.०८.२०२०.
४.ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र: प्रआयो/प्र.क्र.९३/ योजना-१०,दि.१२.११.२०२१.
५. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडील निर्गमित मानधन विषयी मार्गदर्शक सूचनांचे पत्र जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/१९१६/२०२२ दि.१७.०१.२०२२
६. उप सचिव (केंद्रीय योजना), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक २२.११.२०२२.
७. उप सचिव केंद्रीय योजना, ग्राम विकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२४३३/प्र.क्र.-२४/आसक, दिनांक ०३.०३.२०२३.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची दि. २०/१०/२०२३ रोजीची VC आढावा बैठक

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार राज्यातील केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची एकछत्री प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण होण्याच्या दृष्टीने राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची स्थापना करण्यात आली. कार्यालयाच्या बळकटीकरणाकरिता वेळोवेळी कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या

शासन निर्णयान्वये, राज्यातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी करणे व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे याकरिता १६०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरणेकरिता मान्यता देण्यात आली.सदरील पदे जिल्हास्तरावरून बाह्य यंत्रणा संस्था नेमून, त्याद्वारे भरणेबाबत देखील शासन निर्णयांद्वारे निर्देश देण्यात आले होते. सन २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीत सुमारे १३०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची बाह्ययंत्रणेद्वारे जिल्हास्तरावरून आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्यात आली.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र.३ अन्वये, ग्रामविकास विभाग अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कार्यालयातील बाह्य यंत्रणेद्वारे/ कंत्राटी स्वरूपात कार्यरत असणारे कर्मचारी यांची नियुक्ती CSC-SPV या संस्थेमार्फत करणेबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत सर्व कंत्राटी कर्मचारी यांची नियुक्ती सदर संस्थेमार्फत करण्यात आली. दिनांक १ एप्रिल २०२१ पासून राज्यातील सुमारे १३०० कार्यरत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची पदे देखील CSC-SPV या संस्थेमार्फत भरण्यात आली आहेत.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनवाढ करून सुधारणा करण्याबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये धोरणात्मक निर्णय राज्य शासनस्तरावर घेण्यात आला. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ५ अन्वये ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधन अदा करण्याबाबत रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या. असे असताना देखील त्यांनी केलेल्या कामाचे मानधन त्यांना वेळेवर अदा करण्यास CSC-SPV संस्था कमी पडत असलेबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत असे.

यावर उपाय म्हणून संदर्भ क्र. ६ अन्वये कार्यपुर्ती अहवाल (Performance Report) प्राप्त झाल्यानंतर CSC यांनी त्यांच्या निधीतून दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना मानधन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करावे व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी प्राप्त प्रतिपूर्ती (Reimbursement) देयकाची (Invoice) अदायगी CSC यांना करावी, याबाबत सूचना देण्यात आल्या. तरी देखील, सदर मानधन अदायगी करण्यास तेवढाच विलंब होत आहे, अशा तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत होत्या.

त्यानुषंगाने संदर्भ क्र. ७ अन्वये ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या एकूण मानधनापैकी ५०% मानधन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या कार्यालयामार्फत थेट ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना कामाच्या प्रगतीनुसार त्यांच्या खात्यावर अदा करण्यात यावे व उर्वरित ५०% मानधन (१४% सर्व चार्जसहित) CSC या संस्थेमार्फत अदा करण्यात यावे, अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विविध उपाययोजना राबवून देखील आजमितीस ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांचे मानधन ७ ते ८ महिन्यांपासून प्रलंबित आहे. दिवाळी सन काही दिवसांवर असताना केलेल्या कामाचे मानधन न मिळणे योग्य नाही. तसेच संदर्भ क्र. ८ अन्वये दिनांक २०/१०/२०२३ रोजीच्या मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्या आढावा बैठकीत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने या सर्व बाबींचा विचार करता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना तात्काळ मानधन अदायगी करण्याच्या दृष्टिकोनातून पुढीलप्रमाणे कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी.

१. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे आज रोजी सर्व प्रलंबित देयके १०० टक्के प्रमाणे अदा करण्याकरीता Performance Report सहित आवश्यक रक्कम (१०० टक्के प्रमाणे) CSC-SPV संस्थेस अदा करावी. सदरची कार्यवाही दिनांक ०२.११.२०२३ पर्यंत पूर्ण करावी.
२. CSC-SPV संस्थेने प्राप्त Performance Report च्या अनुषंगाने मानधन ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना तात्काळ अदा करावे व या सोबतच Invoice प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना सादर करावे. सदरची कार्यवाही ही दिनांक ७.११.२०२३ पर्यंत करावी. तसेच Invoice प्रमाणे कमी जास्त झालेली रक्कम पुढच्या १० दिवसात समायोजित करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.
३. संदर्भ क्र.७ अन्वये कार्यवाही केली असल्यास सदर रकमेचे समायोजन जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी संबंधित CSC-SPV संस्थेशी करण्यात यावे.
४. सदर कार्यवाही ही दिवाळीच्या निमित्ताने ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या सोयीसाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सदर सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे व प्राधान्याने करण्यात यावी, अन्यथा संबंधितांना जबाबदार धरणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**एकनाथ डवले** (भा.प्र.से.)
प्रधान सचिव
ग्रामविकास व पंचायतराज विभाग,
महाराष्ट्र राज्य

प्रत-
१. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव
५. CSC E- Governance Services India Limited, Mumbai – २७
२/- उपरोक्त क्र. २ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार विहित वेळेत कार्यवाही करावी.